मूल्य ₹ १५/-

# हसती दुनिया

(मराठी)

अंक २ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • फेब्रुवारी - २०१९



# हसती दुनिया (मराठी)

बालकांच्या बौध्दिक आणि आध्यात्मिक विकासाची आगळी वेगळी भेट

अंक २ • वर्ष १६ वे • पृष्ठे ५२ • फेब्रुवारी २०१९

संपादक
राजेंद्र थोरात
(अवैतनिक)

सहसंपादक
सुरेश तिर्लोटकर

सजावट व चित्रे
उदय सत्यवान पांगे
राजनंदन पिंपळकर

संत निरंकारी मंडळ (चेंबूर) करिता मुद्रक व प्रकाशक श्री. चंद्रकांत अनंत जाधव यांनी ही हसती दुनिया पत्रिका एम.पी.प्रिंटर्स, बी-२२०, फेज-II, नोएडा-२०१३०५, जिल्हा-गौतम बुध्द नगर (उत्तर प्रदेश) येथे छापून संत निरंकारी भवन, ५० मोरबाग रोड, दादर (पूर्व), मुंबई-४०० ०१४. येथे प्रकाशित केली.

कार्यालयाचा पत्ता
५०, मोरबाग रोड, संत निरंकारी सत्संग भवन,
दादर, मुंबई - ४०० ०१४
ई-मेल
marathihastiduniya@gmail.com
Website : www.nirankari.org

लेखकांच्या मताशी सहमत असणे अनिवार्य नाही

| देश | 1 वर्ष | 3 वर्ष | 5 वर्ष | 11 वर्ष |
|---|---|---|---|---|
| भारत/नेपाळ | ₹ 150 | ₹ 400 | ₹ 700 | ₹ 1500 |
| यू.के. | £ 15 | £ 40 | £ 70 | £ 150 |
| यूरोप | € 20 | € 55 | € 95 | € 200 |
| अमेरिका | $ 25 | $ 70 | $ 120 | $ 250 |
| कॅनडा/ऑस्ट्रेलिया | $ 30 | $ 85 | $ 140 | $ 300 |

मासिक पत्रिकेविषयी चौकशीसाठी हेल्प लाईन : ०२२-२४१० ५७४९




## कथा

- माता सीतेचा आक्रोश ०६
- सुई, पणती आणि कापूस ०८
- संतोष हेच खरे धन १४
- विदूषकाला अद्दल घडली २०
- जीवनदायी नदी २२
- राहूलचे गणित ४२
- चतुर केरु ४८






## स्तंभ


- दोन शब्द ०४
- शब्दकोडे १०
- दादाला विचारु या ११
- विचारपुष्प १२
- आरोग्याचा मंत्र २४
- वाढदिवसाच्या शुभेच्छा २६
- वैज्ञानिक प्रश्नोत्तरे २८
- दिव्यवाणी ३१
- हसा मुलांनो हसा ३२
- सामान्य ज्ञान ४६
- चित्र काढा आणि रंग भरा ५०


## विशेष व प्रेरक प्रसंग


- नेल्सन मंडेला ०५
- सूरदासांचा सडेतोडपणा २१
- दुर्गभ्रमंती २९
- समर्थ दर्शन -५२ ३४
- तेजस्विनी -८२ ४०
- आपले जिल्हे - मुंबई ४४
- लघुग्रहांची सर्वेक्षणे ४५
- पक्षीजगत ४७








## चित्रकथा


- आजोबा १६
- किट्टी ३६





## कविता


- गुरुत्वाकर्षण १३
- प्रिय आम्हा हसती दुनिया १५
- ह्या आईला काही कळतच.. २७
- कल्पतरु ४१

# रोशनमिनार अर्थात दीपस्तंभ व्हा !

'रोशन मीनार' अर्थात दीपस्तंभ व्हा' हे माता सविंदरजींनी बालकांना केलेले आवाहन त्यांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडणघडणीत किती महत्त्वपूर्ण आहे हे मागील थोर पुरुषांच्या जीवनचरित्रावरुन दिसून येते.

साने गुरुजी यांच्या जीवनातील हा प्रसंग आहे. साने गुरुजी म्हणजे श्याम. यांच्यावर जे संस्कार घडवले गेले, त्यात त्यांच्या आईचा फार मोठा वाटा आहे. श्यामचे वडील खोत होते. पुढे काही कारणास्तव खोतांची श्रीमंती लयास गेली, पण गरिबीतही आईने मुलांना घडवले, वाढवले. एकदा दिवाळीत भाऊबीजेसाठी श्यामचे मामा आपल्या बहिणीकडे आले. आईने त्यांना ओवाळले. ओवाळणी म्हणून मामांनी आईला काही पैसे दिले. त्यानंतर मामा आपल्या गावी निघून गेले.

दुसऱ्या दिवशी श्यामचे वडील सकाळी आंघोळ करुन आले. त्यांनी नेसायला धोतर घेतले. पण पाहतात तर त्याचे चार-पाच तुकडे झालेले होते. वडील म्हणाले, 'धोतर फाडून ठेवलंत, आता मी नेसू काय ?' त्यावर आई म्हणाली, अहो ते तर पार जीर्ण झालं होतं. हे घ्या नवीन धोतर. असे म्हणून आईने त्यांना नवे कोरे धोतर नेसावयास दिले. वडील म्हणाले, आपल्याकडे तर पैसे नव्हते. मग धोतर कुठून आणलंत ? आई म्हणाली, भाऊबीजेला दादाने मला ओवळणी म्हणून काही पैसे दिले होते, त्यातून हे आणलं. वडील म्हणाले, अगं पण ते तर तुझे पैसे आहेत. तू तुझ्यासाठी लुगडं आणायला हवं होतंस. तुझी लुगडीदेखील जुनीच झालेली आहेत. त्यावर आई म्हणाली, मला तर घरातच राहायचं असतं; पण तुम्हाला बाहेर जावं लागतं.

आई-वडिलांचा हा संवाद श्यामने ऐकला. आईचा त्याग, एकमेकांविषयी असलेली आदराची भावना पाहून श्यामचं मन आईविषयी आदरानं अधिकच झुकलं. दुसऱ्याला सुखी करण्यात वाटणारा आनंद तिच्या डोळ्यात त्यानं पाहिला. संस्काराचा हा पैलू बालक श्यामच्या मनावर नकळत कोरला गेला.

एके दिवशी श्यामचा धाकटा भाऊ यशवंत मला कोट घालूनच शाळेत जायचंय असा हट्ट करु लागला; परंतु कोट विकत घेण्याएवढे पैसे नसल्याने आई-वडिलांचा नाईलाज झाला. तेव्हा आपला जमा केलेला गल्ला श्यामने फोडला आणि बाजारात जाऊन यशवंतासाठी कोट घेऊन आला. यशवंत कोट पाहून हरखून गेला. आनंदानं नाचू लागला. त्याचा आनंद पाहून श्यामलाही आनंद वाटला. आईलाही त्याचं बंधुप्रेम पाहून अपार धन्यता वाटली. श्याम पुढे दीन-दुबळ्यांचे अश्रू पुसणारे साने गुरुजी म्हणून ओळखले जाऊ लागले. खरा तो एकचि धर्म, जगाला प्रेम अर्पावे ही शिकवण देणारे 'साने गुरुजी' हे सर्वांसाठी दीपस्तंभ ठरले. तसेच भाव, संस्कार, मार्गदर्शन घराघरातून बालकांना लाभले तर प्रत्येक बालक उद्याचा दीपस्तंभ ठरेल यात शंकाच नाही. यासाठी गरज आहे त्यांना ज्ञानाशी, सत्संगाशी जोडण्याची आणि प्रत्येकाविषयी आदर-सत्काराचा भाव ठेवण्याची !

- राजेंद्र थोरात..





## मानवतेचा पाईक

# नेल्सन मंडेला

दक्षिण आफ्रिकेतील व्हिक्टर वर्स्टर कारागृहाच्या बाहेर हजारो नागरिक, पत्रकार, दूरचित्रवाणीचे कॅमेरे आतुरतेने वाट पाहत उभे होते. सारं जगच त्या क्षणाची वाट पाहत होतं. कारागृहाचे मुख्य प्रवेशद्वार उघडले, एक कृष्णवर्णीय आफ्रिकन व्यक्ती बाहेर आली अन् त्या विशाल जनसागरातून गगनभेदी घोषणा उमटली, 'नेल्सन मंडेला झिंदाबाद!'

वयाच्या चव्वेचाळीसाव्या वर्षी ते गजाआड झाले होते. बहात्तराव्या वर्षी ते बाहेर येत होते. सत्तावीस वर्षे त्यांनी अंधारकोठडीत काढली होती. अपराध काय होता, तर वर्णभेदाला त्यांनी प्रखर विरोध केला होता. संपूर्ण जगाचा हा हिरो लहानपणी शेळ्या मेंढ्यांची राखण करीत असे. त्या काळात काळे-गोरे हा वर्णभेद दक्षिण आफ्रिकेत विकोपाला पोहचला होता. काळ्यांसाठी वेगळ्या शाळा, बेंचेस, बसेस, ओळखपत्रे, प्रवेशबंदी.... गोऱ्यांसाठी राखून ठेवलेल्या बेंचवर चुकून कुणी कृष्णवर्णीय बसलाच तर क्रूर शिक्षा दिल्या जात. या अमानुष, क्रूर, जुलमाविरुध्द नेल्सन मंडेलांनी आवाज उठवला. आंदोलने उभी केली. भूमिगत राहून चळवळ करणाऱ्या मंडेलांना ५ ऑगस्ट १९६२ ला पोलिसांनी ताब्यात घेतले. खटला चालविला, त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. त्यांची पत्नी विनी मंडेला हिने पतीच्या सुटकेसाठी २०-२५ वर्षे सरकारविरुध्द प्रचंड संघर्ष केला. अनेक यमयातना सहन केल्या, संकटे झेलली. शेवटी ११ फेब्रुवारी, १९९० रोजी मंडेलांचा मुक्तिदिन आला. कारागृहाबाहेर उभ्या असलेल्या जगानं त्यांचं हृदयस्पर्शी स्वागत केलं, दोन महिन्यांनी लंडनमध्ये साठ देशांतील दहा लाख जनसमुहापुढे झालेल्या सत्कार समारंभात मंडेला म्हणाले, "मी जगात सगळीकडे प्रजासत्ताक गणतंत्र असलेला स्वातंत्र्यप्रिय समाज पाहू इच्छित आहे. त्यासाठी आजही मी माझे प्राण द्यायला तयार आहे!" मंडेला अगदी खरं बोलले होते. कारण स्वातंत्र्यासाठी प्रचंड किंमत मोजावी लागते, प्रसंगी प्राणांची सुध्दा!

मुळात माणसा-माणसात भेदभाव करणंच चुकीचं आहे. रंग-रुपावरुन कुणाचा द्वेष करणं हे मानवता धर्माच्या विरुध्द आहे. मंडेला मानवता धर्मासाठी लढले. गांधी विचारांचा त्यांच्यावर प्रभाव होता. असा हा मानवतेचा पाईक ५ डिसेंबर, २०१३ रोजी इहलोकीची यात्रा संपवून काळाच्या पडद्याआड निघून गेला.



# माता सीतेचा आक्रोश

माता सीतेला आश्रमात सोडून जात असताना आपले रडू आवरत लक्ष्मण कसाबसा म्हणाला, "देवी सीते, नगरात आणि लोकांमध्ये तुझ्याविषयी जो अत्यंत भयंकर अपवाद पसरला आहे, त्यामुळे श्रीराम अतिशय दुःखी आहेत. मी साऱ्या गोष्टी उलगडून, स्पष्ट करुन सांगू शकत नाही. अग्नीच्या साक्षीने तुझे निर्दोषत्व सिध्द झाले असताना व ते श्रीरामांना मान्य असताना, केवळ लोकोपवादाला घाबरुन महाराजांनी तुझा त्याग केला आहे. आता आणखी काही विचारु नकोस. राजाज्ञेप्रमाणे व तुझ्या इच्छेप्रमाणे मी तुला आश्रमापाशी घेऊन जाईन व तिथंच सोडून देईन." सीतेसह थोडी वाटचाल केल्यावर लक्ष्मण पुढे म्हणाला,

"माते, हे पाहा, गंगेच्या तटावर असलेलं ब्रह्मर्षींचं पवित्र आणि रमणीय तपोवन. तू दुःख करु नकोस. राजा दशरथाचे घनिष्ट मित्र मुनिवर वाल्मिकींचा हा पवित्र आश्रम आहे. मुनीजनांच्या सावलीचा आश्रय घेऊन तू इथं सुखानं राहा."

माता सीतेवर हा मोठाच आघात होता. ती मूर्च्छित होऊन जमिनीवर कोसळली. दोन घटकांनी शुध्दीवर आली. तिच्या डोळ्यांतून अविरत अश्रुधारा वाहत होत्या. दीनवाणेपणे ती लक्ष्मणाला म्हणाली, "विधात्यानं केवळ दुःख भोगण्यासाठी मला जन्माला घातले आहे, हेच खरं. मी पूर्वजन्मी कोणतं पाप केलं होतं, कळत नाही. प्रिय जनांशिवाय एकटीच मी आश्रमात कसा काळ कंठू? कुणाला आपलं दुःख सांगू? मुनिजनांनी मला विचारलं, की महात्मा श्रीरामांनी कुठल्या अपराधाबद्दल तुझा त्याग केला, तर त्यांना कोणत्या तोंडानं आणि काय उत्तर देऊ?"

"सुमित्राकुमार, प्रभो..... मी या क्षणी माझं हे निर्माल्यवत जीवन गंगेला अर्पण केले असते; परंतु त्यामुळे श्रीरामांचा राजवंश नष्ट होणार. ठीक आहे. लक्ष्मणा, तू महाराजांच्या आज्ञेचे पालन कर. या दुःखी सीतेला या वनात एकटी सोडून तू निघून जा. माझे सर्वांना प्रणाम सांग. तसेच सर्व अयोध्यावासीयांना माझे प्रणाम सांग. माझे हृदयनंदन श्रीरामांना माझा संदेश दे."

"त्यांना म्हणावं, अग्नीत भाजून निघालेल्या सोन्यासारखी मी शुध्द व पवित्र आहे. तुमची हितचिंतक व सदैव तुमच्याविषयी प्रेमभाव बाळगणारी आहे. लोकोपवाद दूर करण्याच्या तुमच्या कार्याला साथ देणे हे तर माझे परमकर्तव्य आहे. कारण तुम्हीच माझे सर्वस्व आहात. मी गर्भवती आहे व इक्ष्वाकु वंशाचा अंश गर्भात वाढवीत आहे." सीतेचे हे बोलणे ऐकून लक्ष्मणाचे मन खूपच दुःखी झाले. त्याच्या मुखातून





शब्ददेखील फुटेना. हमसाहमशी रडतच मातृवत असलेल्या देवी सीतेला त्याने प्रदक्षिणा घातली. सीतेचा निरोप घेऊन तो नावेत चढला. नावेने तो गंगेच्या उत्तर तटावर आला. खाली उतरुन रथावर आरुढ झाला. रथ आणि लक्ष्मण दृष्टिआड होईपर्यंत सीता एकटक, शून्य नजरेने पैलतटावर पाहत होती. दुःख आणि शोकाने रडवेली झालेली सीता मग एकट्यानेच आक्रोश करु लागली. मोरांच्या केकारवात तिचा तो रुदनस्वर अधिकच करुण व आर्त भासत होता.

❍ क्रमशः



कथा : नितीन ल. घुरुप (माणगांव)

# सुई, पणती आणि कापूस

धर्मपाल नावाचा एक राजा होता. तो अतिशय धार्मिक होता. प्रजेची काळजी घेणारा हा राजा एकदा एका सत्पुरुषाकडे अनुग्रह घेण्यासाठी गेला. सत्पुरुषाने राजाला आशीर्वाद देत तीन वस्तू त्याच्या हाती दिल्या. त्यापैकी एक होती पणती, दुसरी सुई आणि तिसरी वस्तू होती कापूस. राजा तिन्ही वस्तू घेऊन परतला खरा, पण त्याला त्या वस्तूंचा काही बोध होईना. या वस्तू महापुरुषांनी आपल्याला का दिल्या असाव्या बरं ? यातून काय अर्थबोध होतो ? त्या रात्री राजाला झोपच आली नाही.

दुसऱ्या दिवशी राजाने दरबार भरवला. राजाच्या दरबारात अनेक विद्वान मंडळी होती. त्यांच्यासमोर राजाने आपली समस्या मांडत सांगितले, या तीन वस्तूंचा अर्थबोध जो मला सांगेल त्याला मी अर्धे राज्य

बक्षीस देईन. बक्षीसाच्या लालसेने अनेक विद्वान राजाकडे आले. नाना प्रकारे तर्क-वितर्क करत त्यांनी राजाचं समाधान करण्याचा प्रयत्न केला; परंतु राजाचं काही केल्या समाधान होईना. कारण प्रत्येक जण राजाची स्तुती करत त्याला खूप लाभ होणार आहे अशा गोष्टी वाढवून सांगत होता. राजाला संपत्तीचा लोभ नव्हता. त्यामुळे त्याला या गोष्टी पटत नव्हत्या. पुढे काही दिवस निघून गेले.

एके दिवशी राजा वेष पालटून नगरीत फेरफटका मारत असताना एका मंदिराच्या पारावर काही मंडळी चर्चा करत बसलेली त्याने पाहिली. तोही त्यांच्यात जाऊन बसला. त्या लोकांच्या चर्चेवरुन ती मंडळी धार्मिक असल्याचे राजाला जाणवले. राजाने त्यांच्याशी ओळख करुन घेत सांगितले, की आपण या गावात पाहुणे म्हणून आलेलो आहोत. सहज फेरफटका मारायला निघालो. गप्पांच्या ओघात राजा म्हणाला, "मी असं ऐकलंय, की महाराज धर्मपाल यांना सत्पुरुषाने दिलेल्या वस्तूंचा बोध झाला नाही म्हणून!" त्यावर एकजण म्हणाला, "खरंय ते! आमचे महाराज फार धार्मिक आहेत. पण लालची मंडळींचा गराडा पडलाय ना त्यांच्याभोवती! अहो फार साधा-सोपा अर्थ आहे त्याचा; पण आमच्यासारख्या साधारण माणसाला राजवाड्यात कोण प्रवेश देणार? त्यासाठी मोठा वशिला पाहिजे."

आता राजाला खरा प्रकार कळला. आपल्याला भेटायला सामान्य माणूस येऊ शकत नाही. लोभी आणि स्वार्थी कारभाऱ्यांमुळे आपल्याला प्रजेची दु:खं जाणून घेता येत नाही.

राजाने त्या मंडळींचा निरोप घेतला. दुसऱ्या दिवशी त्याने सेवकाला निरोप घेऊन पारावरच्या मंडळींकडे पाठवले. सर्वांना सन्मानाने राजवाड्यात आणले. ती माणसं गोधळलेली, काहीशी घाबरलेली दिसत होती. राजा म्हणाला, "निवांत बसा, घाबरु नका. मला तुमच्याशी काही गोष्टी बोलायच्या आहेत."

फलाहार झाल्यावर राजा म्हणाला, "माझ्या प्रश्नाचे उत्तर तुमच्याकडे आहे. म्हणून तुम्हाला येथे बोलावणे पाठवले. कृपया मला त्या तीन वस्तूंचा खरा अर्थ काय तो सांगा."

त्या मंडळींमध्ये असलेले वयोवृद्ध गृहस्थ म्हणाले, "महाराज, सुईचा अर्थ आहे जोडणे. कारण सुई जोडण्याचच काम करते. तसं, तुम्ही माणसं जोडा, माणसांची मन जोडा, सर्वांशी प्रेमाचं नातं जोडा असा उपदेश दिलेला आहे. दुसरी वस्तू आहे पणती. पणती अंधार दूर करते. तसं, आपण राज्यातील अज्ञानाचा, भ्रष्टाचाराचा अंधार दूर करावा. सर्वांच्या जीवनात आनंदाचा उजेड आणावा. तिसरी वस्तू आहे कापूस. कापसापासून कापड बनते. कपडे मनुष्यदेहाचं रक्षण करतात. तसं, कुणीही अन्न-वस्त्र-निवारा या वाचून राहू नये हेच महापुरुषांची यातून सूचित केले आहे."

त्या गृहस्थाच्या उत्तराने राजा प्रसन्न झाला. राजाने त्याचे खूप खूप आभार मानले आणि ठरल्याप्रमाणे अर्धे राज्य देऊ केले. त्यावर ते सज्जन गृहस्थ म्हणाले, "महाराज, आम्ही शेतकरी माणसं, राज्य घेऊन काय करु? पोटापाण्यापुरतं कमवावं आणि रोज सत्संग करावा यातच आम्हाला अपार आनंद मिळतो." बाकीची मंडळी देखील त्यांच्या मताशी सहमत झाली. आपल्या राज्यातील नि:स्वार्थ प्रजा पाहून राजा मनोमन भारावून गेला. त्याने सर्वांचा योग्य तो सत्कार करुन त्यांना सन्मानाने पाठवले आणि सत्पुरुषाच्या आदेशाचे तंतोतंत पालन केले. त्यामुळे त्या नगरीत पुढे कधीही दुष्काळ पडला नाही, की कुठलंही संकट आलं नाही. कारण प्रत्येकवेळी प्रजा राजाच्या पाठीशी खंबीरपणे उभी राहिली.

❐❐❐



# शब्द कोडे १७५

❍ पूजा अरोडा ( रेवाडी-हरियाणा )

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ■ | ३ | | ४ | |
| ■ | ५ | | | ■ | | ■ |
| ६ | | ■ | ७ | ८ | | ९ |
| | ■ | १० | ■ | | ■ | |
| ■ | ११ | | १२ | ■ | १३ | |
| १४ | | ■ | १५ | | | ■ |
| ■ | १६ | | | ■ | १७ | |
| १८ | | ■ | १९ | | | ■ |

## आडवे शब्द

१. रामायणातील लवचा भाऊ
३. राजस्थानमध्ये कोणत्या जागेवर १९९८ मध्ये भारताने परमाणु परीक्षण केले होते ?
५. सुंदर रुप रंग नसलेला
६. प्रसिध्द क्रिकेटपटू सुनील गावस्कर यांच्या आत्मचरित्राचे नाव ......... डेज आहे.
७. रायगडावरील एक कडा, बाळाचे पाहणे
११. अंधार या शब्दाचा समानार्थी शब्द
१३. बहिणीची मुलगी
१४. नदीचे पाणी समुद्राला मिळते तो भाग
१५. विमानाचा वेध घेणारे यंत्र
१६. दानवच्या उलट
१७. भारताची पहिली विद्युत रेल्वे ...... फेब्रुवारी १९२५ ला मुंबईत कुर्ला-व्ही.टी. दरम्यान धावली.
१८. मुलगा, सुत
१९. निष्क्रिय या शब्दाचा विरुध्दार्थी

## उभे शब्द

२. कौरवांचा मामा
३. एक पक्षी
४. रोख पैसे, रोकड
६. फुलपाखराला किती पाय असतात ?
८. दुर्योधनाचा दानशूर मित्र
९. या वाक्यात लपलेल्या पाकिस्तानच्या एका शहराचे नाव शोधा : अकरा चीनी सैनिक मारले गेले.
१०. ........ की पळो करणे (म्हण)
११. अजिबात फरक नाही याअर्थी
१२. गाई म्हशींच्या चीक दूधापासून बनविलेला पदार्थ
१३. भारतात कागदी चलन आणि नाणी ..... रिजर्व बँकेकडून काढली जातात.

उत्तरे इतरत्र



# दादाला विचारू या

**प्रश्न : तप-त्याग-साधना म्हणजे काय?**

**उत्तर :** परमसत्याचे ज्ञान ही मानव जीवनाची पहिली साधना आहे. परमसत्य परमात्म्याचं ज्ञान झाल्यावर गुरुच्या वचनानुसार जीवन जगणं यालाच तप, नि:स्वार्थ सेवा, स्वत:पेक्षा इतरांना महत्त्व देणे हाच त्याग होय असे म्हटले आहे.

**प्रश्न भक्ताच्या जीवनात सद्‌गुरुचं स्थान सर्वश्रेष्ठ का असते?**

**उत्तर :** जसे सुगंध निराकार रुपात असतो पण तो साकार फुलांच्या रुपाने प्रकट होत असतो. तसे वरदान, आशीर्वाद हे निराकार रुपात भलेही व्यापक असले तरी सद्‌गुरुच्या द्वारे ते प्रकट होऊन भक्तजनांपर्यंत पोचत असतात, भक्ताचं कल्याण करत असतात. आई-वडील जन्म देतात पण सद्‌गुरु जीवन जगण्याची कला देतात व जन्म-मरणाच्या चक्रातून सोडवतात म्हणूनच भक्ताच्या जीवनात सद्‌गुरुचं स्थान सर्वश्रेष्ठ आहे.

**प्रश्न : ईश्वरप्राप्तीसाठी कोणती साधना किंवा तपश्चर्या करावी लागते?**

**उत्तर :** ईश्वरप्राप्तीसाठी कोणतीही विशिष्ट साधना किंवा तपश्चर्या करावी लागत नाही; परंतु ईश्वराच्या प्राप्तीसाठी प्रथम जिज्ञासा आणि तळमळ असावी लागते. त्यानंतर ब्रह्मज्ञानी सद्‌गुरुचा शोध घेऊन त्याच्या चरणी समर्पित होणे व विनम्रतेने बोध ग्रहण करणे एवढेच करावे लागते.

न लागे सायास। जाणे वनांतरा। सुखे येतो घरा। नारायण।।

किंवा

सद्‌गुरुसी शरण जाय। तयासी ब्रह्मप्राप्ती होय।
न लागे आणिक उपाय। धरी सद्‌गुरुचे पाय।।

ही संतवचनं कुठलीही तपश्चर्या, साधना सांगत नाही.

**प्रश्न : ब्रह्मज्ञानाने जीवनात कोणता बदल घडून येतो?**

**उत्तर :** ब्रह्मज्ञानामुळे विवेक जागृत होतो. म्हणजे सार-असार ओळखण्याची, पारखण्याची क्षमता अंगी येते व असा ज्ञानी पुरुष सत्याचा मार्ग कधीही सोडत नाही. भले त्याच्या मार्गात कितीही अडथळे का येईनात.

❑❑❑





# सद्गुरुच्या दर्शनाने ज्ञानाचा प्रकाश प्राप्त

माणसाची खरी ओळख ही मानवीय गुण आहे. प्रेम, नम्रता, सहनशीलता, विशालता यांसारखे गुण ज्यावेळी जीवनात आचरणात आणले जातात त्याचवेळी माणूस हा माणूस म्हणण्यास योग्य ठरतो.

धार्मिक ग्रंथांचे वाचन-पठण करणे ठीक आहे, परंतु त्या ग्रंथामध्ये लिहिलेले जे कल्याणकारक संदेश आहेत ते आपण आपल्या जीवनात आत्मसात केले नाहीत तर त्या नुसत्या वाचनाचा काहीच फायदा होणार नाही. यासंदर्भात संत

कबीरदासजींचे म्हणणे फारच महत्त्वपूर्ण आहे.

बैठा पंडित पढे पुराण।
बिन देखे का करे बखान।
तू कहे कागज की लेखी।
मैं कहूं आंखन की देखी।

अर्थात, कबीरदासजींच्या जीवनामध्ये सद्‌गुरुचे आगमन झाले तेव्हा त्यांना ज्ञानाचा प्रकाश प्राप्त झाला आणि नंतर ते म्हणाले, की मला ईश्वराचे दर्शन झाले आहे. ही ऐकलेली किंवा वाचनात आलेली गोष्ट नसून मी स्वत: माझ्या डोळ्यांनी ईश्वराला पाहिले आहे. कबीरदासजी दीपस्तंभ झाले. माणसाचे जीवन फार किंमती आहे. वेळीच याची कदर केली पाहिजे. आत्मा ज्यावेळी आपल्या स्वरुपाला जाणतो तेव्हा स्वत: प्रकाशित होतोच, परंतु दुसऱ्यांनाही प्रकाश प्रदान करतो.

आपली तब्येत ठीक नसेल तर माणूस डॉक्टरकडे जातो. डॉक्टर त्याला त्याच्या आजारानुरुप औषध देतो आणि त्याबरोबर काही पथ्यसुध्दा पाळायला सांगतो. जर आजारी व्यक्ती वेळेवर औषध घेणार नाही आणि पथ्यसुध्दा पाळणार नाही तर त्याचा आजार ठीक होणार नाही. त्याचा आजार तेव्हाच बरा होईल जेव्हा तो डॉक्टरने सांगितल्याप्रमाणे औषध घेईल आणि पथ्यही करील. अशाचप्रकारे जेव्हा आम्हाला परमात्म्याची अनुभूती होते तेव्हा दुर्भावनांपासून बचाव होतो. दुर्भावना ही माणसाच्या पतनाचे कारण आहे.

❑❑❑

# गुरुत्वाकर्षण



दोन वस्तूत, असते आकर्षण
तयास म्हणती, गुरुत्वाकर्षण

ज्यादा वस्तुमान, जास्त आकर्षण
दुसऱ्या वस्तूला, ती घेते ओढून

ताऱ्यांना असते, गुरुत्वाकर्षण
त्यांच्या ग्रहांना ते, ठेवती गुंतवून

गुरुत्वीय बलाने, ताऱ्यांभोवती
त्यांचे ग्रह, सतत फिरती

ग्रहांनाही असते, गुरुत्वाकर्षण
उपग्रह फिरती,
त्यांच्याभोवती नेमानं

- कविता : प्रा. देवबा शिवाजी पाटील
खामगाव, बुलढाणा





कथा : एम.के. मजगे (किल्लारी-लातूर )

# संतोष हेच खरे धन

एका श्रीमंत माणसाजवळ अमाप धन होते. तरीही त्याला समाधान नव्हते. एके दिवशी एक साधू त्या गावात आला. श्रीमंत माणसाने त्याची बरीच किर्ती ऐकली, तो त्याच्याकडे गेला. आपली मनोव्यथा सांगितली, “मला सात पिढ्या पुरेल एवढी संपत्ती हवी आहे.” अशी मागणी त्याने

त्या साधूकडे गेली. साधुने श्रीमंताला अपादमस्तक न्याहाळले व ते म्हणाले, “तुझ्या घराजवळ एक झोपडी आहे. त्यात एक म्हातारी तिच्या नातीसह राहते. त्या म्हातारीला पुरेल एवढं एक दिवसाचं धान्य तू तिला नेऊन दे. तुझ्या संपत्तीत पाहिजे तेवढी वाढ होईल.

दुसऱ्या दिवशी तो श्रीमंत माणूस म्हातारीच्या झोपडीत गेला व म्हातारीला म्हणाला, “तुझ्यासाठी आज मी सुग्रास भोजनाचा शिधा आणला आहे त्याचा स्वीकार कर.” म्हातारी नम्रतापूर्वक म्हणाली, “आज आमच्याजवळ एक वेळचा शिधा शिल्लक आहे आणि उद्याची आम्ही काळजी करत नाही.” म्हातारीबरोबर नात सुध्दा म्हणाली, “देणारा परमेश्वर आहे. आम्हाला साठा करुन ठेवायची काय गरज? तुमचा शिधा तुम्ही परत घेऊन जा.” श्रीमंत माणूस चकित झाला. मी तर सात पिढ्यांना पुरेल एवढं धन कमावलं आहे आणि ह्या एका वेळची काळजी न करता सुखी आहेत आणि मी तर दु:खी आहे. खरं सुख, संतोष, समाधानातच आहे व हे समाधान संतांच्या सान्निध्यात सदैव राहिल्यानं मिळत असतं.

तात्पर्य : समाधान हेच खरं सुख आहे.

❑❑❑






## प्रिय आम्हा हसती दुनिया

प्रिय आम्हा हसती दुनिया
आजोबांच्या कथेत असते किमया
सुंदर चित्र सुबक छपाई
वाचून हर्षती दादा ताई
वाढदिवसाचे फोटो भारी
छटा पाहून आनंदती सारी
मिळतो सल्ला आरोग्याच्या मंत्रानं
बुध्दी विकसते सामान्यज्ञानानं
शब्दकोडे फारच छान
वर्गात मिळतो आम्हास मान
संपादकांची आहे मेहर नजर
दोन शब्दांची करावी कदर

- कविता : भक्ती रविकिरण
किल्लारी, लातूर



# आजोबा

चित्रांकन : दीपक मेहरा (दिल्ली)

चित्रांकन -रंग : अजय कालडा







राजूचे आई-वडिल गरीब असल्यामुळे ते त्याला शाळेत पाठवू शकत नव्हते. परंतु राजू फार बुध्दिमान होता त्यामुळे सर्वजण त्याच्यावर प्रेम करत असत.
एकदा काय झालं, राजू डोंगरावर मेंढ्या चारायला घेऊन गेला आणि अचानक जोराचा वारा सुटला.
राजूने सर्व मेंढ्या एकत्र केल्या आणि त्यांना गुहेत घेऊन गेला.


लक्षपूर्वक पाहिल्यावर राजूच्या असे लक्षात आले, की काही मेंढ्या कमी आहेत. त्याने लगेच गुहेचे दार दगडांनी बंद केले आणि उरलेल्या मेंढ्या शोधायला गेला.
सोसाट्याच्या वाऱ्यासोबतच जोराचा पाऊसदेखील पडू लागला होता. तेवढ्यात राजूने पाहिले, की टेकडीवरुन जाणाऱ्या रेल्वेलाईनवर मोठ-मोठे दगड पडले आहेत.
अरे बापरे! जर रेल्वे ह्या दगडांवर आपटली तर फार मोठी दुर्घटना घडू शकते. कदाचित रेल्वे घसरुन खाली दरीत पडू शकते.


जर असं झालं तर फार मोठी जिवितहानी होऊ शकते. तेवढ्यात राजूला रेल्वे येत असल्याचा आवाज ऐकू आला. राजूने ताबडतोब आपल्या गळ्यातील लाल रंगाचा स्कार्फ काढला आणि थोडाही उशीर न करता रेल्वेच्या दिशेने पळत सुटला.
राजू पळतच सुटला होता. तिकडून रेल्वे वेगाने येत होती. तो आपल्या जिवाची पर्वा न करता पळतच होता. स्कार्फ हलवत राजू ओरडत होता - थांबा, थांबा पुढे धोका आहे.
मोटरमनने ज्यावेळी लाल स्कार्फ पाहिला तेव्हा ताबडतोब गाडी थांबवली कारण लाल रंग धोक्याचा संदेश देत असतो.
अपघात होण्यापासून वाचवल्याबद्दल रेल्वेच्या अधिकाऱ्यांनी राजूचे आभार मानून फार कौतुक केले तसेच पारितोषिक देण्याचीही घोषणा केली. गावातील लोकांना जेव्हा ही गोष्ट समजली त्यावेळी त्यांनीही राजूचे कौतुक केले.

कथा

# विदूषकाला अद्दल घडली



एका राजाच्या दरबारात अनेक हुशार मंत्री होते. राजादेखील गुणग्राहक तसेच प्रजेची काळजी घेणारा होता. अधून-मधून करमणूक व्हावी म्हणून त्याने एका विदूषकालाही दरबारात आणून ठेवले होते. कुठेही जाताना आपल्या लवाजम्यासोबत राजा विदूषकालाही सोबत घेऊन जाई. राजा आपल्याला नेहमी सोबत नेतो, तसेच आपण राजाची करमणूक करतो या गोष्टीचा विदूषकाला मोठा अहंकार झाला होता. त्यामुळे दरबारात तो कुणाचाही चटकन अपमान करीत असे; परंतु सारेजण या गोष्टी हसण्यावरी नेत.

एकदा राजा आपल्या लवाजाम्यासह मोठ्या जहाजातून प्रवासाला निघाला होता. अचानक सोसाट्याचा वारा वाहू लागला. जहाजाचं शीड फाटलं. जहाज हेलकावे खाऊ लागलं आणि पाहता पाहता उलटलं. प्रत्येकजण हाताला येईल त्या वस्तूच्या सहाय्याने पोहत किनारा गाठू लागलं होतं. त्यांच्या मदतीला इतर ठिकाणाहून होड्या निघाल्या. फळीच्या आधारे तरंगणाऱ्यांना सुखरुप किनाऱ्याला आणण्यात आलं. या गडबडीत विदूषकही गटांगळ्या

उर्वरीत पान क्र.२३ वर

# सूरदासांचा सडेतोडपणा

संतकवी सूरदास हे जन्मांध होते, परंतु त्यांचं हे वैगुण्य एका उपजत गुणानं झाकलं गेलं होतं. जन्मत:च त्यांना ज्योतिषी आणि शकुन सांगण्याची देणगी मिळालेली होती. अंगभूत देणगीमुळे लहानपणापासूनच ते लोकप्रिय झाले होते. ज्योतिष विचारायला सतत लोक यायचे, त्यामुळे सूरदासांना कधीच शांतता मिळायची नाही. मन:शांतीसाठी त्यांनी लहानपणीच आपलं घर सोडलं होतं, पण तरीही त्यांना मन:शांती काही मिळाली नाही.



आपली ही खंत त्यांनी एकदा वल्लभाचार्यांना बोलून दाखविली. तेव्हा वल्लभाचार्यांनी त्यांना श्रीकृष्णभक्तीचा मार्ग सांगितला. गुरु आज्ञा प्रमाण मानून सूरदासांनी श्रीकृष्णलीलांचं वर्णन करणारी असंख्य पदं त्यानंतर रचली. त्या काव्यानं भाविक आणि रसिक भारावून गेले.


सूरदासांच्या या गीतमाधुर्याची कीर्ती मोगल सम्राट अकबराच्या कानावर गेली. सूरदासांच्या मुखातून त्यांच्याच काव्यरचना ऐकण्याची संधीही अकबराला लवकरच मिळाली. सूरदासांनी केलेलं काव्य ऐकून अकबरही भारावून गेला. सूरदासांनी आपल्या जीवनावर आधारित काव्य लिहावं, अशी अकबरानं त्यांना विनंती केली. सूरदासांना ती कल्पना आवडली नाही. 'मी फक्त कृष्णलीलांचं वर्णन करतो. अन्य कुणावर काव्य करणं मला रुचत नाही,' अशा अर्थाचं पद ऐकवून सूरदासांनी अकबराला सडेतोड उत्तर दिलं.

सूरदासांच्या या परखड उत्तरानं अकबर गप्प बसला नाही. त्यानं पुन्हा त्यांना तशी विनंती केली. त्या बदल्यात दोन-तीन गावाचं इनाम आणि द्रव्य देण्याची तयारी दर्शवली. या प्रलोभनाला बळी न पडता सूरदासांनी स्पष्टपणानं अकबराला आपला नकार कळविला.

अखेर अकबर बादशहानं सूरदासांची मिळतील तेवढी पदं फारसी भाषेत अनुवादित करवून घेतली. अशा तऱ्हेनं त्यानं सूरदासांच्या पदमाधुर्याचा आनंद घेतला. त्यातच त्यानं समाधान मानलं.

कितीही प्रलोभनं समोर आली तरी सूरदासांनी मात्र आपली कृष्णभक्ती सोडली नाही. हेच खऱ्या कलावंत भक्तकवीचं लक्षण होतं.

❑❑❑



# जीवनदायी नदी

एक नदी, अनेक गावं, शहरं आणि प्रांतांचा प्रवास करत अविरत वाहत असते. खळखळ आवाज करुन नाद करत असते. स्वच्छ, मधुर पाणी साऱ्यांना निःस्वार्थ देत असते. अनेक प्राणी, पक्षी आपली तहान भागवण्यासाठी नदी तिरावर येत असत, पाणी पिऊन तृप्त होऊन परतत असत. एकदा झाडावरची रसाळ फळे खाऊन पोट भरल्यावर पाणी पिण्यासाठी नदीवर आणे. साऱ्या पक्ष्यांनी आपल्या चोचीतून अनेक फळ-झाडं आणि फुलझाडांच्या बिया आणल्या, पाणी पिता-पिता त्या साऱ्या बिया नदी पात्रात वाहून गेल्या.

नदीने आपल्या स्वभावानुसार त्या बियांचा स्वीकार केला. त्यांना आपल्या प्रवाहासोबत वाहत-वाहत एका सुपिक प्रदेशात घेऊन गेली. तिथं किनाऱ्यावर त्यांना रुजवलं.

किनाऱ्यालगतची माती त्यांना आधार देऊ लागली, सूर्य किरणांच्या वर्षावात त्या बियांना अंकुर फुटले, त्याची रोपटी तयार झाली, ती वाढू लागली. वर्षामागून वर्ष सरु लागली, नदीच्या पाण्यावर मुळे खोलवर रुजू लागली, झाडे वाढून त्याचे भलेमोठे वृक्ष तयार झाले. आता परिस्थिती बदलली हे मोठाले वृक्ष परोपकाराची परतफेड म्हणून सर्व पक्षी-प्राण्यांना सावली देऊ लागले, उन्हापासून त्यांचं संरक्षण करु लागले, भूक भागवण्यासाठी आपली फळे देऊ लागले, घरटे बांधण्यासाठी आधार देऊ लागले. पण पक्षी किंवा प्राण्यांमार्फत घर बांधण्यासाठी वापरण्यात येणारे झाडाचे कोणतेही पान, कोणतीही फांदी, कितीही वजनदार लाकूड पाण्यात बुडत नव्हतं. ते तरंगून वर येई. मित्रांनो, असं का होतं माहितीये ?

ज्या नदीच्या पाण्याने आईच्या मायेने अनेक वृक्षांना छोट्या बीजापासून मोठं केलं होतं तेच नदीचं पाणी त्या झाडाला, त्याच्या पानाला, त्याच्या कोणत्याही फांदीला कसं काय बुडू देईल ? म्हणूनच मित्रहो, लहानपणापासून आपल्याला घडवणाऱ्या आपल्या आई-वडिलांना, शिक्षकांना, आपल्या मित्र-मैत्रिणींना कधीही विसरु नका. कारण आपल्याला घडवणारे हात आयुष्यात परिस्थिती कोणतीही असो आपल्याला कधीच बुडवणार नाहीत. ते हात असेच आपल्यावर नदीसारखा अविरत कौतुकाचा वर्षाव करत राहतील.

❑❑❑

पान क्र. २० वरुन

## विदूषकाला अद्दल घडली

खात होता. बाजूच्या बेटावरुन काही नावाडी आपल्या होड्या घेऊन आले होते. एका होडीत विदूषकाला घेतलं. विदूषकाला घेऊन जे होडी वल्हवित होते त्यांना विदूषक म्हणाला, “मित्रांनो, माझा तुम्ही जीव वाचवला त्याबद्दल मी तुम्हाला खूप मोठं बक्षीस देईन.” नावाडी म्हणाला, “आम्हाला बक्षीस नकोय. आम्ही तर आमचं कर्तव्य केलंय.” विदूषक म्हणाला, “मग मी तुम्हाला दरबारात मोठी नोकरी देतो. कारण या राजाचा मी फार लाडका आहे. माझा सल्ला घेतल्याशिवाय राजा कुठलंच पाऊल उचलत नाही. राजाबरोबर मी अनेक देश फिरलोय. अशा थापा मारायला त्याने सुरुवात केली.” समोरच एक बेट दिसू लागलं. नावाड्याने विचारलं, “तुम्ही त्या बेटावरच्या राजाला भेटायला कधी गेलात का ?” विदूषक म्हणाला, “हो तर, त्या राजाकडे मी अनेकदा गेलोय. तिथं माझा खूप आदर-सत्कार होतो.” विदूषकाच्या बढाया ऐकून नावाड्याने विदूषकाला त्या बेटावर उतरवले आणि सांगितले या बेटावर दोन दिवस राहा. पाहुणचार करा. मग मी तुम्हाला घ्यायला येतो. विदूषक तिथे उतरला. इकडे-तिकडे पाहतो तर बेटावर चिटपाखरुही दिसत नाही. तोपर्यंत नावाडी पुढे निघून गेला. नावाडी म्हणाला, “आता या बेटावर तूच राजा आहेस कारण इथं कुणीच राहत नाही.” विदूषकाला बढाया मारण्याची चांगलीच अद्दल घडली.

❑❑❑





# आरोग्यदायक लिंबू

लिंबू उत्तम पित्तशामक, वातानुलोमक, जठराग्निवर्धक व आमपाचक आहे. हे आम्ल रसयुक्त (आंबट) असूनही पोटात गेल्यावर मधुर (गोड)बनते. मंदाग्नी, अपचन, गॅस, पोटदुखी, उलटी, मलावरोध, पटकी इ. पोटाच्या आजारांवर हे औषधवत काम करते. हृदय, रक्तवाहिन्या व यकृताची शुध्दी करते. यात पुरेशा प्रमाणात 'क' जीवनसत्त्व असल्याने रोगप्रतिकारक शक्ती वाढविते. हे जंतुनाशक आहे. सकाळी अनशापोटी लिंबाचा रस पाण्यात मिसळून घेतल्याने आतड्यांमध्ये साचलेले विषारी पदार्थ नष्ट होतात, त्याचबरोबर रक्त शुध्द झाल्याने संपूर्ण शरीराची शुध्दी होते, मांसपेशींना नवे बळ मिळते. यामुळे शरीरात स्फूर्ती व उत्साह येतो.

## औषधीय प्रयोग

**दंतरोग :-** १) लिंबाचा रस ताज्या पाण्यात मिसळून गुळण्या केल्याने अनेक प्रकारच्या दंतरोगांमध्ये लाभ होतो. तोंडाचा दुर्गंधही दूर होतो.

२) पिळलेल्या ताज्या लिंबाच्या सालीने दात घासल्यास अथवा साल सुकवून, कुटून बारीक करुन त्याचे मंजन केल्यास दात मजबूत, स्वच्छ व पांढरेशुभ्र होतात.

३) लिंबाचा रस, मोहरीचे तेल व बारीक मीठ मिसळून रोज मंजन केल्यास दातांचे रोग दूर होऊन दात मजबूत व चमकदार बनतात.

४) पायोरियात लिंबाच्या रसाने हिरड्या घासल्याने रक्त व पू येण्याचे थांबते.

५) लिंबाच्या एक चमचा रसात दोन चमचे मध मिसळून घेतल्यास जुन्या खोकल्यात लाभ होतो.

**सर्दी-पडसे -** कोमट पाण्यात लिंबाचा रस व मध मिसळून प्यायल्याने लवकर गुण येतो.

**डोकेदुखी :-** लिंबाच्या दोन सारख्या फोडी करुन थोड्याशा गरम करुन डोके व कानशिलांवर लावल्याने डोकेदुखीत आराम मिळतो.

**घशाचे आजार :-** घशाची सूज, घसा बसणे इ. तक्रारींमध्ये गरम पाण्यात लिंबाचा रस व मीठ मिसळून गुळण्या कराव्यात. ज्यांना खोकल्यात पातळ कफ निघतो त्यांनी हा प्रयोग करु नये.

**केस गळणे :-** लिंबाचा रस केसांच्या मुळाशी घासून १० मिनिटांनी केस धुतल्याने अकाली केस पांढरे होणे, तुटणे किंवा उवा होणे या समस्या दूर होतात.

**डोक्यातील कोंडा :-** डोक्याला लिंबाचा रस व मोहरीचे तेल समप्रमाणात मिसळून लावावे. नंतर दह्याने चांगले घासून डोके धुवावे. या प्रयोगाने काही दिवसांतच डोक्यातील कोंडा दूर होतो.

**पोटदुखी, मंदाग्नी :-** एक ग्लास पाण्यात दोन चमचे लिंबाचा रस, एक चमचा आल्याचा रस व साखर मिसळून प्यायल्याने पोटदुखीत आराम मिळतो. जठराग्नी प्रदीप्त होतो, सपाटून भूक लागते.


**दक्षता :** कफ, कफयुक्त खोकला, दमा तसेच नेहमी अंग ठणकणाऱ्या रुग्णांनी लिंबाचे सेवन करु नये.



# पादहस्तासन

आपल्या सर्वांसाठी महत्त्वाचा असतो तो पाठीचा कणा. हा पाठीचा कणा मजबूत आणि लवचीक बनवण्यासाठी एक आसन आज तुम्हाला सुचवतोय, ज्याचं नाव आहे पादहस्तासन.

**कृती :** सरळ उभं राहून दोन्ही पाय एकमेकांना जोडा. श्वास भरुन हात वर उचलून ताठ करा. वरच्या बाजूला खेचा. इथे खांदे कानाला चिकटून असतील. आता श्वास सोडत कंबरेतून पुढे, खाली वाका. गुडघे न वाकवता हाताचे तळवे जमिनीवर ठेवा. डोकं दोन्ही गुडघ्यांमध्ये आणण्याचा प्रयत्न मात्र करु नका. श्वासोच्छवास सामान्य ठेवून जेवढा वेळ शक्य आहे तेवढा वेळ या स्थितीत थांबा. मग हळूहळू पुन्हा आधीच्या स्थितीत या. दिवसातून दोन-तीन वेळा हे आसन करा.



## फायदे


- जांघा, पोटऱ्यांच्या स्नायूंना हे आसन बळकटी देतं.
- या आसनामुळे बध्दकोष्ठता, गॅस, लठ्ठपणा, मधुमेह, भूक न लागणं हे पोटाशी संबंधीत विकार दूर होण्यास मदत होते.
- हे आसन केल्याने फुफ्फुसं, हृदय आणि मेंदूच्या दिशेनं रक्तपुरवठा वाढतो. यामुळे हे अवयव अधिक कार्यक्षम होतात.
- मुलांची उंची वाढवण्यात हे आसन उपयुक्त ठरतं. सुषुम्ना नाडीवर ताण येत असल्यानं ती मजबूत होते आणि पूर्ण शरीरामध्ये ऊर्जेचं संतुलन कायम राहतं.

**दक्षता :** ॲसिडीटी, उच्च रक्तदाब, हृदयविकार, मायग्रेन, कंबरेचं दुखणं, ऑस्टिओपोरोसिस, स्लिप डिस्क आणि सायटिकाच्या वेदना होत असतील तर हे आसन करु नये.

# वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा


तनिका घाटगे


ग्रिष्मा


अक्षरा


स्वरा पवार


रियान गर्डे


आराध्या कदम


अगम पाटील


अनिकेत कुलकर्णी



नवदेश बिराडी


लक्ष्य नगवडे


अनन्या राणे


रुचिका देवकर


अवनीश कुलकर्णी



स्वरा घुमे



गौरी कस्तुरकर


द्रुषिका देवकर



आयुष कदम



जसवंत रजपूत



सवयसिंग रजपूत


तन्वी बाबर

देवांश हिंगे



सीम सावळकर


आराध्या सुर्वे


विवेका पाटील

कविता : उदय पांगे

# ह्या आईला काही कळतच नाही



ह्या आईला काही कळतच नाही....
या आईला तर काही, काही कळत नाही
ओरडत असते सदान्‌कदा... जरा ब्रेक नाही...
झोपेतून उठवून नेते.... खाण्यासाठी मागे लागते
इतक्या सकाळी कधी.... भूक लागत नाही
या आईला ना काही कळतच नाही
दूध पिताना कार्टून मला, बघू देत नाही
बाबा बघतात बातम्या त्यांना काही म्हणत नाही
सारखी सारखी घड्याळ बघते.... बसू देत नाही
बाथरुममध्ये ओढत नेते... रडू देत नाही
या आईला ना काही कळतच नाही
कपडे, भांग, पावडर, शूज.... सारं करुन देते
बस येईल म्हणून मला.... बाहेर खेचत नेते
उशीर झाला किती म्हणून.... भरभर येते
नमस्कार करायला लावते.... कौतुक करत नाही
या आईला ना काही कळतच नाही
शाळेमधून आल्यावरही, डबा आधी पाहते
संपवला का नाहीस शोनू... नेहमीच ओरडते
अभ्यास काय दिलास माझा हेच पाहत बसते
मी चित्र काढलेलं... लक्ष देत नाही
या आईला ना काही कळतच नाही
होमवर्क... खाणं, क्राफ्ट, डायरी शोधून घेते
मला मात्र बीनची गंमत आठवत असते
लक्ष कुठंय विचारते... धपाटाही देते
तिच्या कसं लक्षात येतं कळतच नाही
या आईला ना काही कळतच नाही
दमून जाऊन झोप येते... मग मला बिलगते
तेव्हा म्हणते शोन्याला वेळ देता येत नाही



## वैज्ञानिक प्रश्नोत्तरे

**प्रश्न : उंच इमारतीचा पाया जास्त रुंद का ठेवतात ?**

**उत्तर :** इमारतीच्या पायावर संपूर्ण इमारतीचे वजन कार्य करते. पाया जास्त रुंद ठेवल्यास इमारतीचे वजन जास्त क्षेत्रफळावर कार्य करते. त्यामुळे इमारतीच्या वजनाने निर्माण झालेला दाब जास्त क्षेत्रपळावर विभागला जातो. त्यामुळे पाया खचण्याची भीती राहत नाही. म्हणून उंच इमारतीचे प्रचंड वजन सहन करण्यासाठी तिचा पाया जास्त रुंद ठेवावा लागतो.

**प्रश्न : उत्तर भारतातील नद्यांना बाराही महिने पाणी का असते ?**

**उत्तर :** उत्तर भारतात पावसाळ्यात पाऊस पडतो. त्यामुळे नद्यांना पाणी असते. हेच पाणी हिवाळ्यातसुध्दा असते. पाऊस पडणे बंद झाल्यावर नद्यांचे पाणी कमी होऊ लागते. नेमका त्याच वेळी उन्हाळा सुरु होतो. त्या उष्णतेने हिमालयातील बर्फ वितळू लागतो. उत्तर भारतातील सर्व नद्या हिमालय पर्वतात उगम पावत असल्याने बर्फाचे पाणी ह्या नद्यात येते म्हणून उन्हाळ्यातसुध्दा त्या नद्यांना भरपूर पाणी असते.

**प्रश्न : उंच भांड्यातील पाणी तापविणे सुरु असताना वरचे पाणी अगोदर का गरम होते ?**

**उत्तर :** उंच भांड्यात पाणी तापविताना विस्तव जरी खालच्या बाजूने लावलेला असला तरी वरचे पाणी अगोदर तापते कारण पाणी तापत असताना त्यात अभिसरण प्रवाह तयार होतात. विस्तवाने खालचे पाणी तापले की ते इतर थंड पाण्याच्या मानाने हलके होते व वर जाते. त्याची जागा भरुन काढण्यासाठी आजुबाजूचे थंड पाणी तेथे येते. ते सुध्दा गरम झाले, की वर जाते. अशाप्रकारे पाण्याच्या वरच्या पृष्ठभागावर गरम पाण्याचा थर जमा होत जातो. ह्या थराच्या मानाने तळाशी असलेले पाणी कमी गरम असते. पाणी तापते खालच्या बाजूला व अभिसरणाने जमा होते वरच्या पृष्ठभागावर. त्यामुळे वरचे पाणी अगोदर तापले आहे असे वाटते.

**प्रश्न : अंधाऱ्या जागी पेटलेली उदबत्ती वेगाने गोल गोल फिरवली असता लाल वर्तुळ का दिसते ?**

**उत्तर :** दृष्टिसातत्याच्या गुणधर्मामुळे एकदा उमटलेली प्रतिमा नष्ट होण्याच्या अगोदर जर डोळ्यात आणखी प्रतिमा उमटल्या तर सर्वांची एकत्रित प्रतिमा डोळ्यात तयार होते. ह्या तत्वाने वेगाने पेटती उदबत्ती फिरवली असता ती अलग न दिसता सलग लाल वर्तुळ दिसते.

❑❑❑



# गाविलगड

गाविलगड हा महाराष्ट्र राज्यातील एक किल्ला आहे. हा किल्ला चिखलदऱ्याजवळ मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये आहे. किल्ल्याच्या भोवती घनदाट जंगल आहे. १२व्या/१३ व्या शतकात गवळ्यांनी बांधलेला हा किल्ला नंतर बलाढ्य गोंडानी घेतला. गाविलगड हा वैभवशाली बांधकाम असलेला किल्ला विदर्भाचे भूषण आहे. हा किल्ला गिरिदुर्ग प्रकारचा असून तो अमरावती जिल्ह्यातील चिखलदरा तालुक्यामध्ये आहे.

## इतिहास :

महाभारतातल्या भीमाने कीचकाशी कुस्ती करुन त्याचा इथे वध केला व त्याला बाजूच्या दरीत फेकून दिले अशी कथा आहे. कीचकाची दरी म्हणजे कीचकदरा. चिखलदरा हा कीचकदरा या शब्दाचे मराठी रुपांतर आहे. इ.स.१८०३ मध्ये दुसऱ्या मराठे-इंग्रज युध्दात या किल्ल्यावर महत्त्वाची लढाई झाली होती. ऑर्थर वेलस्लीच्या इंग्रजी सैन्याने येथे मराठ्यांचा निर्णायक पराभव केला.

हा भूभाग बहमनी सुलतानांच्या ताब्यात होता. तत्पूर्वी या डोंगरावर गवळी लोकांनी हा मातीचा कोट उभारला होता अशी वदंता आहे. बहमनी सुलतानाच्या काळात सातपुड्याच्या संरक्षणासाठी शहाबुद्दीन अहमदशहाने हा बलदंड किल्ला बांधून उत्तरेकडे होणाऱ्या आक्रमणाला पायबंद घालण्याचा प्रयत्न केला. पुढे हा किल्ला औरंगजेबाकडे आला. नंतरच्या काळात हा भोसल्यांच्या ताब्यात असताना यावर बेणीसिंह नावाचा किल्लेदार होता. त्यावेळी झालेल्या इंग्रजांबरोबरच्या युध्दात बेणीसिंहाने अतुलनीय पराक्रम केला. त्याच्या या पराक्रमाची प्रशंसा जनरल सर जेस्पर निकोल्स यांनी आपल्या नोंदवहीत करुन ठेवली आहे.

## गडावरील ठिकाणे :

किल्ल्यावर निजामकालीन कोरीव मूर्ती पाहण्यासारख्या आहेत. गडावर २ तलाव आहेत. साधारणत: १० तोफा नाजूक स्थितीमध्ये असल्या तरी अजूनही शाबूत

आहेत. घोडे, हत्ती इत्यादींचे कोरीव काम व हिंदुस्तानी, उर्दू, अरबी या भाषांमधील मजकूर तोफांवर आढळतो.

मात्र किल्ल्याची तटबंदी, बुरुज ढासळण्याच्या मार्गावर आहेत. किल्ल्याच्या आतील राणीमहल, दरबार व तलाव आजही तत्कालीन वैभवाच्या खुणा जपून आहेत. या किल्ल्यापासून ४५ किलोमीटर अंतरावर असलेला आमनेर येथील छोटा किल्ला म्हणजे विदर्भाचे प्रवेशद्वार पण तोही दुर्लक्षित आहे.

शार्दुल दरवाजाचे भव्य आणि भक्कम बांधकाम चकित करण्यासारखे आहे. दरवाजावरील शार्दुलाची शिल्पे प्रेक्षणीय अशीच आहेत. लांबरुंद पायऱ्या संपल्या की दरवाजामधून किल्ल्यात प्रवेश होतो. आतील पहारेकऱ्यांच्या उभे राहण्याच्या जागा व घुमट पाहून पुढे गेल्यावर एक दरवाजा लागतो. हा दरवाजा म्हणजे चौथा दरवाजा आहे. हा दरवाजा ओलांडून पुढे गेल्यावर गडाचा मुख्य असा दिल्ली दरवाजा वाट अडवून उभा असतो. हा या मार्गावरील पाचवा दरवाजा आहे. या भव्य दरवाजाच्या आतल्या बाजूला पहारेकऱ्यांच्या निवासाचे कक्ष आहेत. दरवाजाला लागूनच असलेले अशा प्रकारचे भव्य बांधकाम महाराष्ट्रातील इतर किल्ल्यांवर सहसा आढळत नाही.

### कसे जाल ?

चिखलदऱ्यापासून मध्य रेल्वेचे बडनेरा हे जवळचे स्थानक ११० किलोमीटरवर आहे. त्याचे मुंबईपासूनचे अंतर ७६३ किमी आहे. एस.टी. महामंडळाच्या येथे येणाऱ्या गाड्या अमरावरती, अकोला, वर्धा, नागपूर इथून नियमित सुटतात. चिखलदरा येथे पोहोचण्यासाठी दोन मुख्य गाडीमार्ग आहेत. त्यापैकी एक जळगाव, भुसावळ, बऱ्हानपूरकडून धारणी, हरिसाल, सेमाडोह व तेथून चिखलदरा असा येतो. हा मार्ग मेळघाट व्याघ्र प्रकल्पातून येत असल्यामुळे हा गाडीरस्ता सूर्यास्त ते सूर्योदय या रात्रीच्या वेळी बंद करण्यात येतो.

दुसरा मार्ग अमरावती, अचलपूर, परतवडा ते चिखलदरा असा आहे. या मार्गावर धामनगाव गडी ते चिखलदरा हा घाटरस्ता आहे. चिखलदरा येथे मुक्कामाची व जेवणाची उत्तम सोय होऊ शकते. चिखलदऱ्यापासून गाविलगडाचं बलदंड किल्ला दोन किमी अंतरावर आहे. हे दोन किलोमीटरचे अंतर कोणत्याही वाहनाने पार पाडता येते. चिखलदऱ्याकडून निघालेल्या एका दांडावरील पठारावर गाविलगडाचा किल्ला बांधलेला आहे.

❏❏❏





# विशेषता आणि जीवन

दुर्जनांचं कार्य तोडण्याचंच असतं. ज्याचा स्वत:चा विश्वास डळमळीत आहे, जो स्वत: सत्संगात येत नाही, तो दुसऱ्याला जोडण्याच्या ऐवजी तोडण्याचंच काम करतो. अशा व्यक्तींपासून दूर राहायचं आहे. आपल्याला विशेषता आणि पहिली प्राथमिकता या निरंकारालाच द्यायची आहे. सर्व संसार आपलं कुटुंबच आहे, कारण आपण या निरंकार प्रभु-परमात्म्याची लेकरं आहोत. आपण कोणाचे वाईट चिंतायचं नाही आणि करायचं पण नाही.

## जीवन

सद्‍गुरुने आपल्याला समजदार होण्यासाठी समज दिलेली आहे, त्या समजदारीचा उपयोग माणूस आपल्यासाठी करत नाही, उलट दुसऱ्याला समजवण्यासाठी उपयोग करतो. स्वत:मध्ये खूप कमतरता आहेत आणि आपण स्वत:हून चुका करतही आहोत तरीही दुसऱ्यावरही बोट दाखवत आहोत आणि त्याला समजवत आहोत. आपण आपला चांगुलपणा आणि दुसऱ्याच्या अवगुणांचा उल्लेख करतो; परंतु महापुरुष आपल्या स्वत:चा चांगुलपणा मागे आणि दुसऱ्यांच्या गुणांना पुढे ठेवतात. संत आपल्या गुणांचा अहंकार करत नाही. दुसऱ्यांच्या गुणांतून चांगलेच गुण शिकतात. निरंकार प्रभु कृपा करो, आपण आपल्यातील अवगुणांना दूर करुया आणि आपले जीवन सजवूया. आपलं जीवन तर सजवूच पण त्याचबरोबर संपूर्ण जगालाही सजवूया.

(- माता सविंदर हरदेवजी)

# हसा मुलांनो हसा

सर : मुलांनो, उद्या आपले प्रमुख पाहुणे चंद्रावर भाषण देणार आहेत. सर्वांनी वेळेवर या.
बंड्या : सर, मी नाही येऊ शकणार.
सर : का ?
बंड्या : माझी आई एवढ्या लांब नाही पाठवणार.

रामभाऊ : काय गजाभाऊ, तुम्ही ऑपरेशन न करताच हॉस्पीटलमधून का आलात ?
गजाभाऊ : काय सांगू. नर्स पुन:पुन्हा सांगत होती, घाबरु नका, हिंमत धरा. छोटसं ऑपरेशन आहे.
रामभाऊ : मग बरोबर तर आहे. त्यात काय एवढं घाबरण्यासारखं ?
गजाभाऊ : अहो, ती मला सांगत नव्हती, डॉक्टरांना सांगत होती.

बाळू काका : काय बन्या, सहामाही परीक्षा संपल्या, आता तुझी दिवाळी नाही का ?
बन्या : कसली दिवाळी नि कसली परीक्षा! अहो काका, दिवाळी आली म्हणून आम्ही आनंदी आणि परीक्षा आली म्हणून दु:खी झालो नाही.
बाळू काका : का ?
बन्या : कारण दोन्ही ठिकाणी दिवेच तर लावायचे होते.

लग्नानंतर खूप वर्षांनी मैनाबाईंची मैत्रीण एके दिवशी त्यांना भेटायला आली.
मैत्रीण : काय गं मैने, तू एवढी हसतमुख असतेच आणि भावजी मात्र एकदम गंभीर! कधी हसताना दिसत नाही. कसं काय पटतं गं तुमचं ?
मैनाबाई : (भाबडेपणाने) चांगलं पटतं की! समजा कुठे लग्न समारंभ किंवा वाढदिवस असा कार्यक्रम असला, की मी तिथं जाते आणि मयताला किंवा बारावं-तेराव्याला ते जातात.

एका गृहस्थाने एक घर विकत घेतले. घरात अधून-मधून आवाज येत होते. या घरात काही प्रॉब्लेम आहे का हे विचारण्यासाठी त्याने शेजारच्या घराची बेल वाजवली.

एका वैतागलेल्या म्हाताऱ्याने दार उघडलं.

शेजारी : नमस्कार काका. मी तुमचा नवा शेजारी. कालच राहायला आलो. इथं काही विचित्र आवाज येतात. भुताटकीचा प्रकार वगैरे तर नाही ना ?

म्हातारा : माहीत नाही, मी मरुन आता दहा वर्षे झाली.

वेटर : (देवराम भोईरला) काय आणू, चहा की कॉफी ?

देवराम: एक कॉपी कवऱ्याला ?

वेटर : वीस रुपये !

देवराम : इस रुपयाला ? आरं बाजूच्या दुकानात तर एक कॉपी दोन रुपयाला हाय !

वेटर : अरे बाबा, ते झेरॉक्सचं दुकान आहे.

गुरुजी : गण्या, न्यायालयात गांधीजींचा फोटो कशाला बरं लावतात ?

गण्या : (खूप वेळ विचार करत) ........ खिळ्याला !

बंटी : बाबा बाबा, मला टेस्टमध्ये ए प्लस मिळाला.

बाबा : वा ! छान छान. कुठल्या टेस्टमध्ये ?

बंटी : ब्लडटेस्टमध्ये !

गुरुजी : बंड्या, वर्गात डुलक्या देतोयस ?

बंड्या : नाही गुरुजी. गुरुत्वाकर्षणामुळे डोकं आपोआप खाली पडतंय.

समर्थ दर्शन : भाग - ५२

# दिलेलखान शरणागत

दिलेलखानाने साधूच्या मार्गाने जायचे कबूल करत जयरामस्वामींना आव्हान दिलं, की तू जर मला रामाचे दर्शन घडवले नाही, तर गोमांस खाऊन तुला मुसलमान व्हावे लागेल. समर्थ तेथे आले. त्यांनी किल्ल्यावरील गंजीच्या छिद्रातून प्रवेश करत जयरामस्वामींनाही खाली बोलावले. जयरामस्वामीही गंजीतून खाली उतरुन किल्ल्याच्या माचीवर जाऊन उभे राहिले. नंतर समर्थ खानास म्हणाले, "तूही साधूच्या मार्गाने येतोस ना ? ये तर खाली, हा येथे राम उभा आहे."

बिचारा खान ! तो कसला जातो त्या गंजीतून ? तो हे अद्‌भूत सामर्थ्य पाहून अगदी वेडा होऊन गेला. तो म्हणाला, "तोबा, तोबा ! या अल्ला ! या अल्ला ! ये हिंदूके फकीर तो बडे अवलिया है !" नंतर तो पळत पळत किल्ल्याखाली गेला आणि समर्थांच्या व जयरामस्वामींच्या पायांवर डोके ठेवून "मी अपराधी आहे. आपल्या धर्माचा आणि आपला छळ केला. क्षमा असावी." असे म्हणू लागला.

त्याला उठवून समर्थ म्हणाले, "बाबा, धर्माचं काय आहे ? कबीर हे मुस्लीमच होते. लीतबखान, मोहंमदखान पठाण हे पूर्वी होऊन गेले. हल्ली श्रीगोंद्यासही महंमदखान आहेतच." खानाने पुन्हा पाय धरले आणि म्हणाला, "कृपा केल्यावाचून पाय सोडणार नाही."

तेव्हा समर्थांनी वरदहस्त मस्तकी ठेवून, "अल्लाचे स्मरण करीत जा, कोणताही धर्म उत्तमच आहे." असा उपदेश केला. त्यामुळे दिलेलखान इतका प्रभावित झाला, की तो त्यांना जाऊच देईना. त्याने त्यांच्या पायांवर लोळण घेतली व येथे निरंतर राहावे म्हणून प्रार्थना केली.

शेवटी समर्थांनी त्याच्याकडून जागा घेतली व तेथे मठ स्थापन करुन त्या मठावर वेणूबाईंची योजना केली आणि सांगितले, "हिच्या आज्ञेत तुम्ही वागलात म्हणजे आमच्या आज्ञेत वागल्याप्रमाणे आहे."

त्याची समजूत घालून समर्थ चाफळकडे निघाले. जाताना मध्यंतरी काही दिवस ब्रह्मनाळी येथे राहून जयरामस्वामींसह वडगावी गेले. तेथे काही दिवस राहून मग चाफळला जाऊन पोचले.

सारंगपुरास इंदूरच्या मठामध्ये उध्दव गोस्वामी यांना नेमले होते, त्याला दोन वर्षे झाली होती. त्यांना समर्थांचे दर्शन घडले नाही. ह्यासाठी त्यांच्याकडून पत्र घेऊन शिष्य आला. 'समर्थांच्या दर्शनाकरिता जिवास फार तळमळ लागली आहे,'



असा त्यात मजकूर होता. तेव्हा तेथे महादेव गोसावी यांना पाठवून दर्शनास येण्याविषयी उत्तर गेले. त्याप्रमाणे उध्दव गोसावीही दर्शनाकरिता चाफळला आले. समर्थांनी त्यांना आज्ञा केली, “ह्यापुढे तू आमच्या सहवासात राहून रघुपतींच्या उपासनेचे कार्य चालू ठेवावे.”

एकदा समर्थ कोंडवणच्या घळीत असताना चाफळला जाण्याकरिता निघाले. पाटणजवळ आले तो कोयना नदीस पूर आला होता. म्हणून पलीकडल्या बाजूला जाण्याकरिता त्यांनी तराफा आणण्यासाठी हाक मारली. तेव्हा चांदजीराव पाटणकर म्हणून एक भला माणूस होता. तो तराफावाल्यांना बोलावून जमवाजमव करु लागला. त्यामुळे थोडा वेळ लागला. इतक्यात समर्थांनी नदीमध्ये उडी घेतली व पलीकडे पोहत पोहत निघाले. पण मध्यंतरी एक भोवरा होता, त्यात सापडून जे बुडाले ते बुडालेच. पुन्हा वर आलेच नाहीत.

दोन्ही थडीच्या पाणवठ्यावर माणसे होती. त्यांनी हे पाहताच, “गोसावी बुडाला” म्हणून एकच आरोळी ठोकली. काहींनी पाण्यात उड्या मारल्या. इतक्यात चांदजीरावही तराफा घेऊन तेथे आले. नदीवर येऊन पाहतात तो हा प्रकार ऐकला. तेव्हा त्यांना फार वाईट वाटले. त्यांनी एक कोसपर्यंत समर्थांचा शोध केला. परंतु काही एक पत्ता लागला नाही.

❍ क्रमशः

## नि:स्वार्थ व प्रेमपूर्ण व्यवहार करावा

या जगामध्ये जे काही दिसत आहे ते कायमस्वरुपी राहणारे नाही. सर्वकाही परिवर्तनशील आहे, पण जेव्हा काहीच नव्हते तेव्हाही हा निराकार परमात्मा होता. जेव्हा काहीच राहणार नाही तेव्हाही हा राहणार आहे. निराकार अंर्तयामी आहे. याला सर्वकाही माहीत आहे, परंतु स्वत:च स्वत:चा अंतर्यामी तर प्रत्येक जण आहे. आपल्याला माहीत आहे की आपण काय चूक आणि काय बरोबर करत आहोत. आपल्याला निराकाराचे इतके भय वाटावे, की आपल्याकडून चूक होऊच नये. संत-महापुरुषांनी या कायम राहणाऱ्या सत्य निराकार प्रभुशी प्रत्येक मानवाला जोडण्याचा प्रयत्न केला. आपलं मोठं भाग्य आहे, की आपल्याला सद्‌गुरुकडून या प्रभुचे ज्ञान प्राप्त झाले, आपल्याला सेवा करण्याची संधी मिळाली आहे. नेहमी हेच लक्षात ठेवायचे आहे, की आपण सेवा, सत्संग, स्मरण दृढतापूर्वक करत रहावे आणि सर्वांशी प्रेम, नम्रता, सहनशीलता, सत्कारपूर्ण व्यवहार करत रहावा.

– माता सविंदर हरदेवजी





# किट्टी

चित्रांकन व लेखन : अजय कालडा







हूं!!! मस्त मला रोज हेच खायला आवडेल आई.
पाहिलंस बेटा, घरात बनवलेलं अन्न न खाण्याचा परिणाम. पडलीस ना आता आजारी.
हो आई
आता तुला आम्हा सगळ्यांना खाव्वंच लागेल.


आम्ही सर्व तुझे मित्रच आहोत. तू लवकर बरी व्हावीस असं आम्हाला वाटतं
पण आई तर सांगत होती, की काही दिवस मला कडू औषधं घ्यावी लागतील.
जर तू आमचं ऐकलंस तर लवकर बरी होशील
पण ते कसं ?
हे बघ मी आहे दूधी. विटामीनची खाण आणि पचन्यास देखील छान!
हो दूधी! आई देखील तुझ्याबद्दल हेच सांगत असते.


मला खाल्याने तुझ्या डोळ्यांची नजर वाढेल
आम्ही सर्वजण फारच पौष्टिक आहोत.
आई ! आजपासून मी सर्व भाज्या खाईन आणि तुला कधीच तक्रार करण्याची वेळ येऊ देणार नाही.



तेजस्विनी - ८२

# न्या. गीता मित्तल

जम्मू-काश्मीर उच्च न्यायलयाच्या मुख्य न्यायाधीशपदी विराजमान झालेल्या न्या. गीता मित्तल यांनी इतिहास घडविला आहे. काही दिवसांपूर्वीच त्यांनी पदाची शपथ घेतली आणि जम्मू-काश्मीर उच्च न्यायालयाच्या पहिल्या महिला मुख्य न्यायाधीश बनण्याचा मान त्यांनी मिळविला. विधी आणि न्याय क्षेत्रातील त्यांच्या साडेतीन दशकांतील त्यांचा प्रवास उच्च न्यायलयाच्या शीर्ष स्थानापर्यंत येऊन पोहोचला आहे. या स्थानावरुन न्यायदान करण्याचा अनुभव त्यांना आहे; कारण जम्मू-काश्मीर उच्च न्यायलयात दाखल होण्यापूर्वी त्या दिल्ली उच्च न्यायलयाच्या प्रभारी मुख्य न्यायाधीश होत्या. दिल्ली उच्च न्यायालयात दीर्घ काळ वकिली केल्यानंतर १६ जुलै २००४ मध्ये त्या दिल्ली उच्च न्यायालयात अतिरिक्त न्यायाधीश म्हणून रुजू झाल्या. गेल्या चौदा वर्षातील न्यायदानाच्या कारकिर्दीत न्या. मित्तल यांनी स्वतःचा ठसा उमटविला आहे. दिल्ली उच्च न्यायलयात असताना सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या विषयांची त्या स्वतःहून जनहित याचिकांत रुपांतर करण्यास त्यांनी सुरुवात केली.

विशेषतः महिला सुरक्षा, मुलांचे प्रश्न, अंमली पदार्थ, नागरी सेवा आदी विषयांबाबत संवेदनशीलता दाखवून त्या त्या विषयांवर सुनावणी घेत. टोकाच्या अन्यायाच्या प्रकरणांबाबतही त्या तितक्याच संवेदनशील दाखवत. निर्भयपणे साक्ष देण्यासाठी साक्षीदारांना सुरक्षा देण्याचा त्यांचा प्रकल्प महत्त्वाचा. मानवी हक्क, महिलांवरील अत्याचार, कारावासाच्या शिक्षेचा महिलांवरील परिणाम, मृत्यूदंड, स्वामित्व हक्क, पर्यावरण संवर्धन आदी विषयांवर सातत्याने लेखन करणाऱ्या न्या. मित्तल यांचा एकूणच समाजाकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्पष्ट होतो. नागरी क्षेत्रातील महिलांसाठीचा सर्वोच्च पुरस्कार मानला जाणाऱ्या 'नारीशक्ती पुरस्कारा'च्या यंदाच्या मानकरी असलेल्या न्या. मित्तल आपली मुद्रा उमटवतील, यात शंका नाही.

❑❑❑



# कल्पतरु

कोकणचा कल्पतरु, नारळाला म्हणतात
सण समारंभी, गौरव त्याचा करतात

उंच शेंड्यावर, नारळ लागतो
त्यात गोड पाणी, निसर्ग भरतो

आजारीपणात बनतो मित्र
ताजातवाना होतो गलितगात्र

नारळाच्या वस्तूंचे वेगळे तंत्र
झावळीचे छप्पर देते मायेचे छत्र

लग्न समारंभाला, नारळाला मान
प्रत्येक कार्यक्रमात त्याचाच सन्मान

नारळाचे उपयोग वर्णन किती करु
म्हणूनच याला म्हणती कल्पतरु






# राहूलचे गणित

महेश्वरनगरामध्ये गणेश नावाचा एक गृहस्थ आपल्या परिवारासह राहत असे. तो पोपट विकण्याचा व्यवसाय करत असे. त्याला एक राहूल नावाचा मुलगा होता. चौथीमध्ये तो शिकत होता. राहूल गणित विषयात फार हुशार होता. गणेश हा शहरातून व्यवसायासाठी पोपट व पिंजरे आणत असे. घरापासून थोड्याच अंतरावर त्याचं एक छोटसं दुकान होतं. दुकानातून लोक पोपट व पिंजरे विकत घेत असत. त्या नगरामध्ये व आजूबाजुच्या परिसरात 'गणेश पोपटवाला' म्हणून त्याची प्रसिध्दी होती. त्याचे दुकान बऱ्यापैकी चांगले चालत होते.

गणेशने असा विचार केला, की पोपटाबरोबर चिमण्यांसारखे रंगीबेरंगी छोटे पक्षी आणले तर आपल्या व्यवसायात चांगला फायदा होईल. म्हणून त्याने छोटे पक्षी आणले आणि त्याला गिऱ्हाईकाने सुध्दा साथ दिली. प्रत्येक दिवशी दिडशे ते दोनशे

पक्षी व पोपटांची विक्री होऊ लागली. धंदा तर चांगला होत होता. पण जेव्हा हिशोब करायचा तेव्हा त्यात तूट यायची. हिशोबात गडबड व्हायची. गणेशला समजत नव्हते, की असे का होते ? त्यामुळे त्याचे घरी व इतर कामाकडे लक्ष लागत नव्हते. हे त्याच्या पत्नीच्या व मुलाच्या लक्षात आले. मग मुलाने मनात ठरवले, की पप्पा दिवसभर दुकानात कसा व्यवहार करतात ते आपल्याला पहायला हवे. राहुलने पप्पांना सांगितले, की मी तुमच्याबरोबर दुकानात येणार आहे. गणेशने त्याला सांगितले, की तू तुझ्या अभ्यासाकडे लक्ष दे आणि खूप शिक. माझ्यासारखा अशिक्षित राहू नकोस. मी शिकलो नाही त्यामुळे मला कधी कधी व्यवसायात नुकसान होते. राहुलने सांगितले, की मी फक्त एक दिवस येईन; बाकी दिवस तर माझा अभ्यास करीन. शेवटी गणेश म्हणाला, ठीक आहे. राहूल दुकानात एका बाजूला बसून वडील व्यवसाय कसा करतात ते पहात होता. पप्पा पैशांची तर देवाण-घेवाण बरोबर करतात. पण मोठ्या पिंजऱ्यातून ते पोपट किंवा छोटे पक्षी काढून ते गिऱ्हाईकाला छोट्या पिंजऱ्यात टाकून पिंजरे व पक्षी विकत असत. परंतु एका पिंजऱ्यातून दुसऱ्या पिंजऱ्यात टाकताना पक्ष्यांची फार धडपड होत असे. त्यातील काही पक्षी इकडे तिकडे धावत असत, काही पक्षी पिंजऱ्याच्या बाहेर निघत असत. पण ही गोष्ट दिवसभरात देवाण घेवाणामध्ये गणेशच्या हे लक्षात येत नसे, की दिवसभरात कमीत कमी तीन ते चार अथवा पाच-सहा पक्षी पिंजऱ्याबाहेर पडून उडून जात असत. त्यामुळे त्या पक्षांची किंमत वाया जात असे आणि म्हणून फायद्याच्या ऐवजी तोटा होत असे. हे राहूलच्या लक्षात आले त्याने आपल्या आईला सांगितले. आई म्हणाली, पिंजऱ्यात अगोदरच पक्षी भरुन ठेवले आणि नंतर गिऱ्हाईकांना पिंजरे न उघडताच पक्षी दिले तरच फायदा होईल. पण ते शक्य नव्हते कारण प्रत्येक पक्ष्यांसाठी पिंजरा असणे गिऱ्हाईकालाही परवडणार नाही. काहींना २५ पक्षी हवे असतात तर काहीना ५ पक्षी, तर काहींना १० पक्षी हवे असतात. तर पिंजरा न उघडताच हवे तेवढेच पक्षी देणे शक्य नव्हते. राहूल ने विचार करत वहीवर पिंजऱ्याचे चित्र काढून त्यात तो संख्या लिहू लागला. जर गिऱ्हाईकाने किती पक्षी मागितले तर त्यांना पिंजरा न उघडताच आपण गिऱ्हाईकाने मागितलेले पक्षी देऊ शकतो. वहीवर असे पिंजरे काढून त्यात पक्ष्यांची संख्या भरत असे. असे करता त्याने सात पिंजऱ्यामध्ये १२७ पक्षी असे भरले, की कोणताही गिऱ्हाईक येऊन १२७ पर्यंत ज्या संख्येचे पक्षी मागेल त्याला पिंजरा न उघडताच पिंजऱ्यासकट पक्षी द्यायचे आणि जे पिंजरे विकले गेलेत त्याच संख्येचे पिंजरे भरुन ठेवायचे म्हणजे गिऱ्हाईकाला देवाण-घेवाण करतेवेळी पिंजरा उघडण्याची गरज नव्हती. तर राहूलने पप्पांना सात पिंजरे अशाप्रकारे भरुन दिले व त्यांना समजावले, जर एखाद्या गिऱ्हाईकाने समजा २५ पक्षी मागितले तर त्याला (१) व (८) आणि (१६) असे तीन पिंजरे दिले व तर त्याला २५ पक्षी देता येतात. अशाप्रकारे कोणतीही संख्या १२७ पर्यंत पिंजरा न उघडताच देता येते. त्याप्रमाणे गणेशने करुन पाहिले तर त्याचा व्यवसाय फार चांगल्या प्रकारे होऊ लागला. हिशोबातसुध्दा गडबड न होता नफा होऊ लागला. तेव्हा मम्मी-पप्पाने राहूलचे खुप कौतुक केले आणि त्याला खूप आशीर्वाद दिले.

❒❒❒



# मुंबई शहर व मुंबई उपनगर

तालुके : पूर्वीच्या बृहन्मुंबई जिल्ह्यातून अंधेरी, कुर्ला व बोरीवली ही उपनगरे वेगळी करुन याच तीन तालुक्यांचा मुंबई उपनगर जिल्हा बनला आहे. उर्वरित भाग मुंबई जिल्ह्यात मोडतो.

नदया : मोठ्या नद्या नाहीत.

खनिजे : नाहीत. फक्त किनाऱ्यालगतचे मीठ

धरणे : मोठी धरणे नाहीत.

## विशेष माहिती -


प्रेक्षणीय स्थळे : गेट वे ऑफ इंडिया, छत्रपती शिवाजी म्युझियम (प्रिन्स ऑफ वेल्स म्युझियम), मलबार हिल, नेहरु उद्यान, हँगिग गार्डन, तारापोरवाला मत्स्यालय, जहांगीर आर्ट गॅलरी, गिरगाव-दादर-जुहू चौपाट्या, हुतात्मा स्मारक

महत्त्वाची स्थळे : मंत्रालय, विधानभवन, ऑगस्ट क्रांती मैदान, सहार व सांताक्रूझ विमानतळ, ब्रेबॉर्न व वानखेडे स्टेडियम, भाभा अणुसंशोधन केंद्र, गोरेगाव येथील फिल्मसिटी हा स्टुडिओ, ट्रॉम्बे (तुर्भे) तेलशुध्दीकरण कारखाना, बॉम्बे हाय खनिज तेलाची विहीर, ओबेरॉय व ताजमहल सारखी पंचतारांकित हॉटेल्स, एस.एन.डी.टी. विद्यापीठ, महात्मा फुले मंडई (क्रॉफर्ड मार्केट), जिजामाता उद्यान (राणीचा बाग), प्राणीसंग्रहालय, रेसकोर्स, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची समाधी - चैत्यभूमी व त्यांचे राष्ट्रीय स्मारक उभारले जाणार आहे.

मुंबई ही महाराष्ट्राची राजधानी, भारताची आर्थिक राजधानी, भारतातील सर्वात मोठे औद्योगिक केंद्र, सुती वस्त्रोद्योगाचे देशातील सर्वात मोठे केंद्र, चित्रपटनिर्मितीचे देशातील सर्वात मोठे केंद्र, देशातील लोकसंख्येची सर्वाधिक घनता असलेले शहर यासाठी प्रसिद्ध आहे.

❐❐❐







# लघुग्रहांची सर्वेक्षणे

लघुग्रहांचा पध्दतशीर शोध घेण्यासाठी दोन लघुग्रहांची सर्वेक्षणे कार्यान्वित केली गेली होती. १९५० ते १९५२ मधील मॅक्डोनल्ड सर्वेक्षण आणि १९६० चे पॅलोमार-लायडन सर्वेक्षण. या सर्वेक्षणात मध्य प्रतियुतीच्या वेळी छायचित्रिय पेक्षा अधिक तेजस्वी असलेले असे जवळ जवळ पाच लघुग्रह सापडले. यामध्ये २१.५ किमी पेक्षा मोठा व्यास असलेल्या लघुग्रहांचा समावेश होतो. आतापर्यंत साडे सहा लाख लघुग्रहांचा शोध लागलेला आहे. साधारणत: ५ ते १० मिनिटाला एक लघुग्रह शोधला जातो. पहिला लघुग्रह सेरेसा हा १८०१ मध्ये शोधण्यात आला. पृथ्वीजवळ वर्तुळाकार कक्षा असलेल्या ४ लघुग्रहांना अटेन्स असे नाव आहे. लहान आकारमाने असलेले लघुग्रह संख्येने अधिक आढळतात. त्यांचे आकारमान वितरण सर्वसाधारणपणे त्यांच्या परस्परांतील टकरींमुळे त्यांचे तुकडे होण्याच्या प्रक्रियेनुसार दिसून येते.

**लघुग्रहांना नाव देणे :** लघुग्रहांचे नामाभिधान दोन प्रकारे करण्यात येते. ज्या लघुग्रहांची कक्षा अनेक वेधानंतर नक्की माहीत झाली आहे. त्याची लघुग्रहे सूचीमध्ये नोंद करुन त्याला क्रमांक देण्यात येतो; जसे ४३३ -एरॉस. नवीनच सापडलेल्या लघुग्रहास दोन इंग्रजी अक्षरांचे तात्पुरते नाव देऊन त्याची कक्षा पूर्ण ज्ञात झाल्यावर सूची क्रमांक देण्यात येतो. अक्षर जोडीतील पहिले अक्षर उपग्रह ज्या महिन्यात सापडला तो महिना व पंधरवड्याचा क्रमांक दाखवतो तर  दुसरे अक्षर त्या लघुग्रहाच्या क्रमांकाचे दिग्दर्शन करते. लघुग्रह सूचीत समाविष्ट झालेल्या लघुग्रहांच्या पुढील काळातील स्थानांची पूर्वानुमाने दरवर्षी लेनिनग्राड येथील इन्स्टिट्यूट फॉर थिऑरेटिकल ॲस्ट्रॉनॉमी या संस्थेमार्फत प्रसिध्द केली जातात. यामध्ये त्याच्या निश्चित कक्षा, सहनिर्देशक, प्रत्येकाचे निरिक्षण करण्याचा अनुकूल काळ इ. माहितीचा समावेश असतो.



# सामान्य ज्ञान



१) लीप वर्ष असताना फेब्रुवारी महिन्याचे किती दिवस धरतात ?

अ) २८ ब) २९ क) ३० ड) ३१

२) बिस्मिल्लाखान हे कोणते वाद्य वाजवत असत ?

अ) बासरी ब) तबला क) शहनाई ड) संतूर

३) रामदास स्वामींनी लिहिलेल्या ग्रंथाचे नाव काय ?

अ) गुरुचरित्र ब) पांडवप्रताप क) अभंगगाथा ड) दासबोध

४) कोणत्या फळाचे बी फळाच्या बाहेर असते ?

अ) काजू ब) बदाम क) फणस ड) नारळ

५) 'पहाट तारा' कोणाला म्हणतात ?

अ) शनि ब) शुक्र क) गुरु ड) मंगळ

६) खालीलपैकी कोणते पीक नगदी पीक आहे ?

अ) ज्वारी ब) गहू क) नाचणी ड) कापूस

७) 'गुरुदेव' ही मानाची पदवी देऊन कोणाचे नाव आदराने घेतले जाते ?

अ) धोंडो केशव कर्वे ब) रवींद्रनाथ टागोर

क) वासुदेव बळवंत फडके ड) विनायक दामोदर सावरकर

८) पंजाबात जाऊन समतेचा संदेश देणारे संत कोण ?

अ) संत ज्ञानेश्वर ब) संत कबीर क) संत एकनाथ ड) संत नामदेव

९) २१ फेब्रुवारी हा कोणता दिवस म्हणून युनेस्कोने घोषित केला ?

अ) मराठी दिन ब) हिंदी दिन क) मातृभाषा दिन ड) इंग्रजी दिन

१०) देशातील सर्वात लांब दुमजली बोगीबिल पूल कोणत्या नदीवर बांधण्यात आला ?

अ) ब्रह्मपुत्रा ब) गंगा क) यमुना ड) सिंधू

उत्तरे इतरत्र



# विविधरंगी तपकिरी होला

व्हलगड, छोटी कवडी, भोरी अशा विविध नावांनी ओळखला जाणारा कबुतरासारखा दिसणारा हा पक्षी आहे. याच्या वेगळ्या आवाजामुळे याला इंग्रजीत लाफिंग डव्ह म्हणतात. हा पक्षी आफ्रिका, मध्य आखाती देश आणि आशिया खंडात आढळतो. भारतात सर्वत्र आढळणाऱ्या या पक्ष्याला बोली भाषेत कवडा असंही म्हटलं जातं.

हा साधारणपणे २४-२५ सेंटीमीटर आकाराचा असून, मुख्यत: तपकिरी रंगाचा असतो. गुलाबी-तपकिरी रंगाच्या व निळसर झाक असलेल्या या पक्ष्याच्या पंखांवर व मानेवर काळे ठिपके असतात. हा कवडा पक्षी त्याच्या आवाजामुळे लगेच ओळखता येतो. उडताना क्रू डू डू असा विचित्र आवाज हा पक्षी काढतो. त्याचं अजून एक वैशिष्ट्य म्हणजे त्याचे लालसर पाय. या पक्ष्याची आफ्रिकन प्रजात ही गडद निळसर-तपकिरी रंगाची असते. असा हा विविधरंगी चमकदार पक्षी इतर पक्ष्यांमध्ये उठून दिसतो.

हा पक्षी मनुष्य वस्तीत रमतो. त्यामुळेच मनुष्य वस्तीत वास्तव्य करणारा हा कवडा फारसा स्थलांतर करत नाही; परंतु एका अभ्यासात असं आढळून आलं आहे, की काही कवडा पक्षी अगदी २०० किलोमीटर अंतर कापून पाकिस्तानातून गुजरातमध्ये आलेलेही आढळून आले आहे. हा पक्षी समूहात आढळतो. एखाद्या तलावाकाठी वा नदीकाठी पाणी प्यायला थव्याने आलेले कवडा पक्षी दिसतात. कवडा पक्षी कायम जोडीनेच फिरतो. या पक्ष्यांना मोठ्या शिकारी पक्ष्यांपासून स्वत:चं संरक्षण करावं लागतं.

विविध बिया, फळं हे याचं मुख्य खाद्य आहे. याचं घरटं मऊ गवत, काड्या, काटक्या व पानं वापरुन गोलाकार आकारात तयार केलेलं असतं. एखाद्या जाड बुंध्याच्या झाडात जमिनीपासून चार ते पाच मीटर उंचीवरच बनवलेलं असतं. नर व मादी जोडीने हे घरटं बांधतात.

जानेवारी ते एप्रिल हा या पक्ष्यांचा प्रजननाचा काळ आहे. मादी एक दिवसाआड एक याप्रमाणे दोन ते तीन अंडी देते. ही अंडी १३-१५ दिवस उबवल्यानंतर पिल्लं बाहेर येतात व पुढील १४-१५ दिवसात उडण्यास सक्षम होतात. या काळात नर व मादी दोघं मिळून पिल्लाचं संगोपन करतात.

❒ संग्राहक : अंकित जाधव



कथा

# चतुर केरु

बादशहा अकबराच्या राज्यात शेरू आणि केरु समोरासमोर राहत असत. दोघांमध्ये सतत काही ना काही कारणांवरुन भांडणे होत असत. शेरु केरुला नेहमीच संकटात अडकवण्याच्या युक्त्या शोधत राहायचा.

एके सकाळी शेरु आपल्या घराच्या दरवाजात उभा राहून जोरात ओरडला, "देवाची करणी देवच जाणे." केरु पलीकडून ओरडला, "देवाची करणी मी सुध्दा जाणे." शेरुला कारण मिळाले. त्याने

अकबराकडे केरुची तक्रार केली. देवाचा अपमान केल्यावरुन केरुला दरबारात बोलावण्यात आले. केरु म्हणाला, “हो! जहाँपना, मी हे सिध्द करु शकतो.”

बादशहा चकित झाला व तसे करुन दाखवण्याची आज्ञा केली. त्यावर केरु म्हणाला, “ही बाहेरुन वाहणारी यमुना नदी देवाचीच करणी नाही तर दुसरे काय आहे?” बादशहाला त्याचे म्हणणे पटले. त्याने केरुला सोडून दिले आणि शेरु हात मळत बसला.

काही दिवसांनी शेरु पुन्हा आपल्या घराबाहेर येऊन ओरडला, “माझ्या मनातील मीच जाणू.” त्यावर केरु ओरडून म्हणाला, “तुझ्या मनातील मीही जाणू.” मामला पुन्हा बादशहा अकबराकडे गेला. केरुने न घाबरता उत्तर दिले, की हो शेरुच्या मनात काय आहे हे मी जाणतो. देवाने बादशहा सलामतला एक गोड मुलगा द्यावा, असे याच्या मनात आहे.

त्यावेळी अकबर बादशहा मूल व्हावे म्हणून अनेक प्रयत्न, नवस, सायास करत होता. हे ऐकून शेरू त्या गोष्टीला नकार देऊ शकला नाही. खूष झालेला राजाने केरुला भरपूर बक्षीस देऊन पाठवले.

❒❒❒


## ज्ञानाचा प्रकाश गरजेचा

चांगल्या गोष्टीचे कौतुक करणे चांगली गोष्ट आहे, पण चांगल्या गोष्टी स्वीकारणे त्याहूनही चांगले आहे. परोपकारी संत महात्मा चांगल्या गोष्टी आपल्या जीवनात अंगीकारतात आणि पूर्ण प्रयत्नही करतात की या चांगल्या गोष्टी जगातील सर्व लोकांपर्यंत पोचाव्यात, हा ज्ञानाचा प्रकाश ठिकठिकाणी पोचावा. महापुरुष ठिकठिकाणी या निराकार प्रभू परमात्म्याचा प्रकाश पोचवतात कारण ते जाणतात, की अंधारातून केवळ ठोकरच मिळते आणि ज्या व्यक्तीला हा ज्ञानाचा प्रकाश मिळतो त्याच्या जीवनातून अंधकार नाहीसा होतो, त्याचे जीवन प्रकाशमय होते. अंधार अंधाराला मिटवू शकत नाही, प्रकाश अंधाराला मिटवू शकतो. जसे प्रकाशासाठी एक दिवा असणे पुरेसे नाही, तर त्याला पेटवून वास्तविक प्रकाश प्राप्त करायचा असतो. त्याचप्रकारे केवळ ज्ञानाचा उल्लेख करणे, ज्ञानाच्या गोष्टी करणे, ऐकणे, ऐकविणे एवढेच पुरेसे नाही, जोपर्यंत आपण हे ज्ञान स्वत: अंमलात आणत नाही, आपला कर्ता भाव सोडून सद्‌गुरुची शिकवण आत्मसात करत नाही, तोपर्यंत बाहेरचा अंधार भलेही आपण दिवा लावून नाहीसा करु पण आतला अंधार संपणार नाही.

– माता सविंदर हरदेवजी



# चित्र काढा आणि रंग भरा



## सामान्यज्ञान उत्तरे

१) ब
२) क
३) ड
४) अ
५) ब
६) ड
७) ब
८) ड
९) क
१०) अ

श्र
ब्द
को
डे

१
७
५

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| १ कु | २ श | | ३ पो | ख | ४ र | ण |
| | ५ कु | रु | प | | क्क | |
| ६ स | नी | | ७ ट | ८ क | म | ९ क |
| हा | | १० स | | र्ण | | रा |
| | ११ का | ळो | १२ ख | | १३ भा | ची |
| १४ ख | डी | | १५ र | डा | र | |
| | १६ मा | न | व | | १७ ती | न |
| १८ पु | त्र | | १९ स | क्री | य | |

।। तू ही निरंकार ।।

# वैर - द्वेषाच्या पाडून भिंती
# प्रेमाचे पूल बांधत जाऊया



शंकरराव जाधव
मुखी, वाई तालुका

महालक्ष्मी

सर्वांसाठी... सर्वकाही... एकाच ठिकाणी...

लग्न बस्त्याची खास सोय !



अविनाश शंकरराव जाधव
प्रचारक, सातारा झोन

**THE COMPLETE FAMILY SHOWROOM**

मनमोहक साडया । ड्रेस मटेरिअल । मेन्स वेअर । चिल्ड्रन्स वेअर
। लेडीज वेअर । सुटींग शर्टींग । रेमण्ड सियारामचे विक्रेते

सद्‌गुरू की निगाहे करम एक अगर पड जाये,
मुक्कदर फिरसे लिखने को खुदा मजबूर हो जाये...

सद्‌गुरू होता जग का दाता जो चाहे कर सकता है
पत्थर दिल भी गर पैरों को छुले भवसागर तर सकता है

९९९, हरिहरेश्वर प्रतिक, आय.डी.बी.आय.बँक शेजारी, ब्राह्मणशाही, वाई (जि.सातारा)

फोन नं. : 9766727262 / 8999859073

RNI No. MAH/MAR/2004/15105
Postal Regd. No. MCE/78/2019-2021
WPP Licence No. MR/TECH/WPP-164/East/2019
Publishing date on 1st of every month
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office,
Mumbai-400001 on dated 1st of every month

॥ तुझी निरंकार ॥



जनार्दन एच्. पाटील
झोनल प्रमुख-नाशिक क्षेत्र

ऑफिस : गाळा नं. १,४,६,८ महावीर इंडस्ट्रियल इस्टेट,
नारिंगी फाटा, विरार (पूर्व),
ता. पालघर, जि. ठाणे - ४०१३०५ (महाराष्ट्र)
कार्यालय : (०२५०) २५२७३२०/९८२२८८५५२६
ई-मेल : rajinustries2010@yahoo.in
janardanpatil6500@gmail.com
वेबसाईट : www.vijayaengineeringworks.com
www.rajindustries.net.in

# मे. विजया इंजिनिअरींग वर्क्स



मॅन्यु : स्पेशालिस्ट प्लास्टिक इंजेक्शन मोल्ड आणि ब्लो मोल्ड (घेर ओरम टाईप डाईज)

# मे. राज इंडस्ट्रीज




मॅन्यु. फार्मास्यूटिकल्स कॅप्स (कोलॅप्सीबल आणि लॅमी ट्युब कॅप्स),
पेस्टीसाईड पॅकेजींग, एच.डी. आणि पी.पी. बॉटल



# वाबाजी कंस्ट्रक्शन कं.

सिडको आणि सरकारमान्य प्राप्त १ रुम हॉल किचन, २ रुम हॉल किचन
दुकानाचे गाळे तसेच इन्डस्ट्रीअल गाळे कर्ज सुविधांसहित योग्य भावात मिळतील.

जनार्दन हा. पाटील | राकेश ज. पाटील
अंचित रा. पाटील | कुशल रा. पाटील